महाराष्ट्र शासन
**पोलीस अधीक्षक, कार्यालय भंडारा**
E-mail : sp.bhandara@mahapolice.gov.in ☎:- 07184 – 252440- 9405831100

क्रमांक:- पोअभं/कक्ष-१०/पोलीस भरती- /लेखी परिक्षा प्रेस नोट/२०२६ 1616 भंडारा    दि १२/०३/२०२६

## प्रेस नोट

---ooo---

पोलीस अधीक्षक, भंडारा या आस्थापनेवर पोलीस शिपाई पदासाठी लेखी परिक्षा करीता पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ११ ते १२.३० वा दरम्यान जे.एम.पटेल कॉलेज भंडारा, मुस्लीम लायब्ररी चौक, भंडारा येथील शाळेमध्ये घेण्यात येणार आहे.

सदर लेखी परिक्षेकरीता पात्र असलेल्या उमेदवारांनी **दिनांक १५/०३/२०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता जे.एम.पटेल कॉलेज, मुस्लीम लायब्ररी चौक, भंडारा येथे परिक्षेकरीता हजर राहावे. लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र हे महाआटी विभागमार्फत ऑनलाईन पध्दतीने डाउनलोड करण्यास उपलब्ध आहे.**

१) सर्व उमेदवारांनी दिलेल्या वेळेत व दिलेल्या ठिकाणी हजर राहणे बंधनकारक आहे. परिक्षा सुरु झाल्यानंतर आलेल्या उमेदवारांना कोणत्याही परिस्थितीत प्रवेश दिला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

२) उमेदवारांनी परिक्षेसाठी येतांना शासकिय ओळखपत्र, महाआयटी विभागा मार्फत कडुन यापुर्वी देण्यात आलेले प्रवेशपत्र,आधारकार्ड व या कार्यालयाकडुन शारीरिक चाचणीवेळी देण्यात आलेले कापडी चेस्ट क्रमांक सोबत आणने बंधनकारक आहे. तसेच स्वता:चे पासपोर्ट साईज आकाराचे प्रवेशपत्रामध्ये नमुद केलेले फोटोची एक प्रत सोबत आणावी. **महाआयटी विभागा कडुन देण्यात आलेले प्रवेशपत्रावरील सिट क्रमाकानुसार बैठक व्यवस्था करण्यात आलेली आहे.**

३) उमेदवारांना पॅड व पेन परिक्षेवळी पोलीस अधीक्षक कार्यालया भंडारा कडुन पुरविले जाणार असल्याने मुद्या क्र.२ मधील नमुद कागदपत्राव्यतीरीक्त इत्तर कोणतेही साहित्य परिक्षा केन्द्रावर घेवुन जाण्यास मनाई आहे.

४) **उमेदवारांनी मोबाईल, स्मार्ट वॉच, गणकयंत्र, डिजीटल डायरी, मायक्रोफोन, ईअरफोन, ब्लुटूथ यंत्र जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे.** तसे निदर्शनास आल्यास, अथवा उमेदवार इत्तर कोणत्याही बेकायदेशीर मार्गाचा अवलंब करत असल्याचे आढळुन आल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई केली जाईल व संबधीत उमेदवारास पुढील पोलीस भरती प्रक्रियेतुन तात्काळ अपात्र केले जाईल.

**( नूरूल हसन भा.पो.से )**
**पोलीस अधीक्षक भंडारा**



Scanned with OKEN Scanner